# अर्चना वार्षिकांक विभाग अहवाल

सत्र २०१३–१४

**प्रा. डॉ. सौ. चित्रा चवडे**
**विभाग प्रमुख**



सत्र २०१३–१४ मध्ये अर्चना वार्षिकांक संपादक मंडळाची परीक्षा बुधवार दि. ९सप्टेंबर२०१३ रोजी घेण्यात आली. परीक्षेमध्ये ३०विद्यार्थी सहभागी झाले होते.त्यातून आठ विद्यार्थी संपादक मंडळात सहभागी करण्यात आले.एम.ए.(मराठी)द्वितीय वर्ष कु.वैशाली नंदेश्वर या विद्यार्थिनीची मुख्य संपादिका म्हणून निवड झाली. संपादक मंडळाची बैठक घेऊन त्यात अर्चना वार्षिकांकाची रचना कशी करावी,याबाबत चर्चा करुन मुखपृष्ठ,मांडणी व इतर विषय घेण्यात आले. प्रस्तुत अर्चना वार्षिकांकाचे मुखपृष्ठ आंतरराष्ट्रीय ख्यातीचे आफ्रिकन निग्रोंच्या सामाजिक न्यायासाठी आयुष्यभर लढा देणारे डॉ.नेल्सन मंडेला यांना समर्पित करण्यात आले.



प्रस्तुत अर्चना वार्षिकांकात विविध विषयावरील २४ लेख असून २०कविता आहेत.तसेच आवश्यक तेथे पानपूरके म्हणून संस्कृत सुभाषिते,मराठीतील सुविचाराचा वापर करण्यात आला आहे. शेवटी सर्व विभागांचे अहवाल दिलेले आहे.

या अंकाचा प्रकाशन समारंभ दि.०३.०४.२०१४ ला प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.